मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आषाढीवारी पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी पिंपरी चिंचवड महापालिका सज्ज..!

**आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून पालखी सोहळा मार्गाची पाहणी : संत तुकाराम महाराज यांची पालखी 19 जून रोजी तर संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी 20 जून रोजी शहरात दाखल होणार**

**पिंपरी | प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ संत ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या आषाढीवारी पालखी सोहळ्याचे आगमन पिंपरी चिंचवड शहरात होणार आहे. जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची पालखी भक्ती-शक्ती चौकात १९ जून रोजी तर संतश्रेष्ठ संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी २० जून रोजी शहरात दाखल होणार आहे. या दोन्ही पालख्यांच्या स्वागतासाठी पिंपरी चिंचवड महापालिका सज्ज असून त्याचा आढावा घेण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी पालखी मार्गाची पाहणी केली.



या पाहणी दौऱ्यावेळी विठ्ठल मंदीराचे विश्वस्त तसेच महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम,पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे, शिवाजी पवार, सहायक पोलीस आयुक्त सचिन हिरे, सह शहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, देवन्ना गट्टूवार,नितीन देशमुख, उपायुक्त अण्णा बोदडे, सचिन पवार, राजेश आगळे, क्षेत्रीय अधिकारी किरणकुमार मोरे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, कार्यकारी अभियंता विजय वाईकर, वैशाली ननावरे, नितीन देशमुख,शिवाजी वाडकर, संतोष दुर्गे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे,प्रशासन अधिकारी ज्ञानेश्वर ढवळे, सहाय्यक आरोग्याधिकारी राजू साबळे तसेच पोलीस निरीक्षक बापू डेरे, भोजराज मिसाळ यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आयुक्त शेखर सिंह म्हणाले,पालखी मार्गावर अडथळा होणार नाही याबाबत पोलिसांनी खात्री करून परवानगी दिल्यानंतर महापालिका परवानगी देण्याचा निर्णय घेईल.रस्त्यांची डागडूजी, विद्युत विभागाची कामे येत्या दोन दिवसात पूर्ण करावी. पालखी मार्गावर अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटविण्यात यावी. पावसाळ्याच्या अनुषंगाने आवश्यक आपत्ती व्यवस्थापन करावे. पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन करावे. तातडीच्या वैद्यकीय सुविधेसाठी आवश्यक ठिकाणी महापालिकेच्या वतीने आवश्यकतेनुसार रुग्णवाहिका उपलब्ध ठेवाव्यात, असे निर्देश आयुक्त सिंह यांनी अधिकाऱ्यांना दिले. जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची पालखी भक्ती-शक्ती चौकात १९ जून रोजी तर संतश्रेष्ठ संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी २० जून रोजी शहरात दाखल होणार आहे. या दोन्ही पालख्यांच्या स्वागतासाठी पिंपरी चिंचवड महापालिका सज्ज असून त्याचा आढावा घेण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी पालखी मार्गाची पाहणी केली.

### आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून पाहणी

» आषाढीवारी पालखीने पिंपरी चिंचवड शहराच्या हद्दीमध्ये प्रवेश केल्यानंतर निगडी येथील भक्ती शक्ती येथे सर्व वारकरी बांधव तसेच विश्वस्त आणि दिंडीप्रमुख यांचे महापालिकेच्या वतीने दरवर्षी प्रमाणे स्वागत केले जाणार आहे. या ठिकाणी उभारण्यात येणारा स्वागत कक्ष तसेच करण्यात येणाऱ्या व्यवस्थेबद्दलची माहितीही पाहणी दौऱ्याच्या वेळी आयुक्त सिंह यांनी घेतली. आकुर्डी येथील विठ्ठल मंदिरामध्ये जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखीचा मुक्काम असतो. या ठिकाणची देखील त्यांनी पाहणी करत माहिती घेतली. याशिवाय खराळवाडी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर, खंडोबा माळ परिसर, काळभोर नगर यासह पालखी मुक्कामाचे ठिकाण येथे पाहणी करून आयुक्त सिंह यांनी आढावा घेतला.

---

# कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला; अनेक जण वाहून गेल्याची भीती

**तळेगाव दाभाडे जवळील प्रसिद्ध पर्यटनस्थळ कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवर असलेला जूना पूल कोसळून दुर्घटना घडली आहे**

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. तळेगाव दाभाडे जवळील प्रसिद्ध पर्यटनस्थळ कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवर असलेला जूना पूल कोसळून दुर्घटना घडली आहे. रविवार असल्याने पर्यटकांची गर्दी होती, यावेळी हा पूल कोसळून अनेक पर्यटक इंद्रायणीत बुडाल्याची भीती व्यक्त केली जात आहे.



मावळमध्ये कुंड मळ्यात पूल कोसळल्याने काही पर्यटक बुडाल्याची माहिती मिळत आहे. ही घटना साडेतीनच्या सुमारास घडल्याचं सांगण्यात येत आहे. घटनास्थळी पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयातील तळेगाव दाभाडे पोलीस दाखल झाले आहेत. कुंडमळा ओलांडण्यासाठी, या बाजूवरून दुसऱ्या बाजूला जाण्यासाठी पूल आहे. हाच पूल कोसळला आहे.

मावळ मधील कुंडमळा हा पर्यटन स्थळांपैकी एक आहे. आज रविवार सुट्टीचा दिवस असल्याने अनेक पर्यटक त्या ठिकाणी गेल्याची शक्यता वर्तवली जात आहे. पर्यटकांची संख्या पूलावर जास्त झाल्याने हा पूल कोसळल्याच बोललं जात आहे. अद्याप कुंड मळ्यात किती पर्यटक बुडाले आहेत. याबाबत अद्याप आकडा स्पष्ट होऊ शकला नाही. २० ते २५ जण बुडाल्याची भीती व्यक्त होत आहे. घटनास्थळी अग्निशमन दल, मावळ वन्यजीव रक्षक यांची टीम पोहचली आहे. बचावकार्य सुरू आहे. दोन दिवसांपासून मावळ परिसरात मुसळधार पाऊस कोसळत असून इंद्रायणीच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. यामुळे नदीत पडलेल्या पर्यटकांना वाचविण्याचे शर्तीचे प्रयत्न यंत्रणांकडून सुरू आहे.

# पुणेकरांचा संताप अजित पवारांच्या तोंडून!

## रस्त्यावर पाणी साठून होणाऱ्या वाहतूक कोंडीला नागरिक कंटाळले, रस्त्यावरील अडथळ्यांबाबत मेट्रो आणि पीएमआरडीएची कानउघाडणी




**पुणे | प्रतिनिधी**

पावसामुळे रस्त्यावर साठणारे पाणी, मेट्रोची रखडलेली कामे आणि त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी यामुळे पुणेकरांचे हाल होत आहेत. महापालिकेकडून तक्रारीची योग्य दखल घेतली जात नसल्याची तक्रार नागरिक सातत्याने करत आहेत. अशातच पालकमंत्री अजित पवार यांनी पुणेकरांच्या या समस्येची गंभीर दखल घेतली आहे. स्पष्टवक्ते अशी ओळख असलेल्या अजित पवारांच्या तोंडून पुणेकरांचा संताप बाहेर पडल्याने अधिकाऱ्यांची बोलती बंद झाली. शनिवारी (दि. १४) वाहतूक विभागाच्या बैठकीत पवारांनी शहरात होणाऱ्या वाहतूक कोंडीचे खापर अजित पवारांनी मेट्रोवर फोडले. पुणेकरांचा संताप उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या तोंडून व्यक्त झाला.

या बैठकीमध्ये अजित पवारांनी हिंजवडी येथील टाटा मेट्रोच्या अडथळ्यांचा उल्लेख करत परिसरातील राडारोडा हटवला नाही, तर दंडात्मक कारवाई केली जाईल असा इशारा दिला. "सोमवारपर्यंत हिंजवडी मेट्रोचे अडथळे दूर न केल्यास पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाला १० कोटी रुपयांची दंडाची नोटीस पाठवली जाईल," असे त्यांनी स्पष्ट केले. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली निघावा, यासाठी पुणे मेट्रोचे जाळे विस्तारले जात आहेत. मात्र, याच कामांमुळे पुणेकरांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. मेट्रोच्या कामामुळे रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात राडारोडा पडला आहे. अशातच पाऊस सुरू झाल्यामुळे या समस्येत आणखी भर पडली आहे. मेट्रोचा राडारोडा चिखलात मिसळल्यामुळे रस्ते अधिकच खराब झाले आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे रस्त्यावर वाहनांच्या लांबचलांब रांगा लागल्याचे दिसत आहे.

### पथविभागाचा संथ कारभार

» पथविभाने आदर्श रस्ते तयार करण्याबाबत एक मॉडेल बनविले होते. मात्र दुसरीकडे ड्रेनेज, महावितरण, बड्या कंपन्यांच्या इंटरनेट केबल्स टाकण्यासाठी ठिकठिकाणी विभागाकडून खोदाईसाठी परवानगी देण्यात आली आहे. खोदाईनंतर त्या जागी तातडीने पुन्हा डांबरीकरण होणे अपेक्षित असताना अनेक ठिकाणी पुन्हा डांबरीकरण झाले नसल्याची तक्रार नागरिक करीत आहेत. त्यामुळे रस्त्यावर ठिकठिकाणी डबकी तयार होऊन पाणी साठते. परिणामी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. यातून पालिकेच्या आदर्श रस्ते मॉडेलचे पितळ उघडे पडल्याची टीका नागरिकांकडून होताना दिसत आहे.

### पावसाळी लाईन बुजविल्या

» मेट्रोकडून बहुतांश ठिकाणी पावसाळी लाईन बुजविण्यात आल्या आहे. पालिकेकडून वारंवार सूचना देऊनही या पावसाळी लाईनची स्वच्छता करण्यात न आल्याने रस्त्यावर पाणी साठताना दिसते. पावसाळी लाईनबद्दल मेट्रोने गांभीर्य न दाखविल्याने रस्त्यावर पाणी साठत असल्याची तक्रार नागरिक करीत आहेत. तसेच, पुणे मेट्रो आणि पीएमआरडीएकडून नागरिकांच्या सोयीचा विचार न करता कामे केली जात असल्याच्या तक्रारी नागरिक करीत आहेत.

### महापालिका नाही गंभीर

» शहरातील काही रस्त्यांवर पावसाळी लाईनच नसल्याची माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी दिली. एकीकडे सिमेंटचे रस्ते बांधले जात आहे. मात्र, रस्त्यांवर पावसाळी लाईन नसल्याने रस्त्यावरील पाण्याचा निचरा होण्यास अडथळे निर्माण होताना दिसत आहे. पाण्याचा निचरा होण्यासाठी रस्त्यावरील दुभाजकांवर पंक्चर करण्याबाबत मागील वर्षी ध्यानात आले असतानाही बहुतांश ठिकाणी दुभाजकांवर पंक्चर करण्यात आले नाही. त्यामुळे पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होत आहे. तसेच, ओढे-नाल्यांवरील अतिक्रमणांबाबतही पालिका कठोर भूमिका घेताना दिसत नाही. अनेक ठिकाणी ओढे-नाल्यांवरील बांधकामांना पालिकेकडूनच परवानगी मिळाल्याचे नागरिक सांगतात. त्यामुळे नैसर्गिक प्रवाहांना अडथळा निर्माण झाल्याने अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साठते. महापालिकाच याबाबत गंभीर नसल्याची टीका नागरिक करीत आहेत.

> शुक्रवारी कमी कालावधीत मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. त्यामुळे शहरातील प्रमुख ठिकाणी पाणी साचले, तरी क्षेत्रीय कार्यालयनिहाय टीम तयार करून यंत्रणेद्वारे तातडीने कारवाई करण्यात आली. काही ठिकाणी पावसाळी लाईनची व्यवस्था नसल्याने पाहणी करून तातडीने कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत
>
> **- ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका**

# शहर स्वच्छतेत नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष अभियान

## जनजागृतीबरोबरच प्रशासकीय यंत्रणेतील त्रुटी दूर करण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.




**पुणे | प्रतिनिधी**

'स्वच्छ शहर, सुंदर शहर' असे देशपातळीवरील अनेक पुरस्कार मिळवूनदेखील शहरातील अनेक रस्त्यांवर कचरा पडलेला असतो. यावर उपाययोजना करण्याबरोबरच स्वच्छतेमध्ये नागरिकांचा सहभाग वाढावा, यासाठी शहरात लवकरच विशेष अभियान राबविले जाणार आहे.स्वच्छतेच्या संदर्भात नागरिकांचा सहभाग, जनजागृतीबरोबरच प्रशासकीय यंत्रणेतील त्रुटी दूर करण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले. महापालिका आयुक्त राव यांनी शुक्रवारी शहरात स्वच्छतेचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींची बैठक घेतली. बैठकीला महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन, पृथ्वीराज बी. पी., ओमप्रकाश दिवटे, तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम आदी उपस्थित होते.

'या बैठकीत स्वच्छ पुणे अभियानांतर्गत शहरातील कचरा वर्गीकरणाचे प्रमाण शंभर टक्क्यांपर्यंत नेणे, कचऱ्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प सुरू करणे, वस्ती पातळीवर जागृती मोहीम राबवणे, शाळा आणि महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा शहर स्वच्छतेमध्ये सहभाग वाढविणे आदी विषयांवर बैठकीत चर्चा झाली. स्वच्छतेमध्ये नागरिकांचा सहभाग वाढावा, याकडे भर देण्यात येणार आहे,' असे आयुक्त राम यांनी सांगितले.

महापालिकेच्या यंत्रणेकडूनदेखील अनेकदा स्वच्छतेच्या कामाकडे दुर्लक्ष होते. स्वच्छतेच्या कामात प्रशासकीय यंत्रणेच्या त्रुटी दूर करण्यावर यापुढील काळात अधिक भर राहणार आहे. शहरात स्वच्छतेचे काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांची, तसेच झाडणकाम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या हजेरी संदर्भात लक्ष दिले जाणार आहे. या कर्मचाऱ्यांची हजेरी नोंदविण्यासाठी त्यांना देण्यात आलेल्या उपकरणांची माहिती घेऊन यामध्ये अधिकाधिक पारदर्शकता कशी येईल, तसेच कर्मचाऱ्यांसह शहरातील नागरिकांचा सहभाग कसा वाढेल, यावर भर दिला जाणार आहे,' असे राव यांनी स्पष्ट केले.

> केंद्र, राज्य पातळीवर स्वच्छतेबाबत अभियान राबविले जाते. पुणे शहर स्वच्छ ठेवण्यासाठी त्याच पद्धतीने अभियान राबविण्याचा प्रयत्न आहे. यासाठी समाजातील सर्व घटकांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी चर्चा करून त्रुटी दूर केल्या जाणार आहेत. स्वच्छता मोहिमेत सर्वांचा सहभाग कसा होईल, यासाठी प्रयत्न असणार आहे.
>
> **- नवल किशोर राम,महापालिका आयुक्त**

# एका प्रभागात असणार 49 ते 59 हजार मतदार

## महापालिकेच्या निवडणूक विभागाने सुरू केले असून, आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या चार सदस्यीय एक प्रभाग हा 49 हजार ते 59 हजारांचा असणार आहे. सरासरी 53 हजार मतदार एका प्रभागात असतील. प्रभाग रचनेचे काम महापालिकेच्या निवडणूक विभागाने सुरू केले असून, आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.

**गुगल अर्थ मॅपचा आधार घेण्यात येणार**

शहराची सन 2011 ची जनगणना विचारात घेऊन प्रत्येक प्रभागातील मतदारसंख्या निश्चित करण्यात आली आहे. त्यादृष्टीने प्रगणक गट (ब्लॉक) जुळवून प्रभाग तयार करण्याचे काम सुरू झाले आहे. त्यासाठी गुगल अर्थ मॅपचा आधार घेण्यात येणार आहे. प्रभाग रचना तयार करण्यासाठी 37 दिवसांची मुदत आहे.

त्यासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यात सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांच्यासह स्थापत्य, नगररचना, बांधकाम परवानगी आदी विभागाचे अधिकाऱ्यांचा समावेश आहे. प्रभाग रचनेचे प्रत्यक्ष कामकाज महापालिकेने सुरू केले आहे. त्यासाठी प्राथमिक बैठका झाल्या आहेत. आयुक्तांनी फेब्रुवारी 2017 च्या निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागांची माहिती घेतली. त्याबाबत प्राथमिक चर्चा करण्यात आली.

शहराची 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या 17 लाख 29 हजार 359 आहे. त्यानुसार, प्रत्येक प्रभागात किमान 49 हजार आणि कमाल 59 हजार मतदार संख्येचा समावेश केला जाणार आहे. सरासरी 53 हजार मतदारांचे प्रमाण एका प्रभागात असतील.

त्या दृष्टीने प्रभागरचना नकाशा तयार केला जाणार आहे. त्यासाठी 2011 च्या जनगणनेची माहिती तपासणे, स्थळ पाहणी करणे, गुलल मॅपवर प्रभाग नकाशे तयार करणे आदी प्रक्रिया केली जाणार आहे. त्या कामकाजासह प्रारूप प्रभाग रचनेच्या मसुद्यावर समितीने स्वाक्षर्या करणे, ही सर्व प्रक्रिया 7 जुलैपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

**22 जुलैला प्रभाग रचना प्रसिद्ध होणार !**

प्रारूप प्रभागरचना राज्य निवडणूक आयोगाकडे 8 ते 10 जुलैला पालिका आयुक्त सिंह यांच्याकडून पाठविला जाईल. आयोगाकडून प्रभाग रचनेला मान्यता मिळाल्यानंतर 22 जुलैला प्रभागरचना प्रसिद्ध केली जाईल. त्यावर त्या दिवसापासून दहा दिवस म्हणजे 31 जुलैपर्यंत हरकती व सूचना स्वीकारल्या जातील.

त्यावर 1 ते 11 ऑगस्ट अशी म्हणजे 11 दिवस सुनावणी घेतली जाईल. त्यानंतर हरकती व सूचनांवरील शिफारशी विचारात घेऊन प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अंतिम केलेली प्रभागरचना 12 ते 18 ऑगस्ट या कालावधीत निवडणूक आयोगाकडे मान्यतेसाठी पाठविली जाईल. राज्य निवडणूक आयोगाने अंतिम केलेली प्रभागरचना अधिसूचनेद्वारे 29 ऑगस्ट ते 4 सप्टेंबर या कालावधीत प्रसिद्ध केली जाईल. तेव्हा प्रभाग रचनेचे कामकाज संपणार आहे.




### प्रभाग रचनेनंतर आरक्षण सोडत

**» पिंपरी-चिंचवड शहरातील चार सदस्यीय 32 प्रभागांची रचना 4 सप्टेंबरपर्यंत अंतिम होईल. त्यानंतर महिला तसेच, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (एसटी आणि एसटी) जागेसाठी आरक्षण सोडत काढली जाईल. त्यानंतर प्रभाग रचनेनुसार मतदारयादी तयार करण्याचे काम केले जाईल. अखेरीस निवडणूक कार्यक्रम वेळापत्रक जाहीर होईल. त्याचा कालावधी दीड ते दोन महिने इतका असू शकतो.**

### शहरात 16 लाख 75 हजार 654 मतदार

- » पिंपरी विधानसभा : 3 लाख 91 हजार 607 मतदार
- » चिंचवड विधानसभा : 6 लाख 63 हजार 622 मतदार
- » भोसरी विधानसभा : 6 लाख 8 हजार 425 मतदार
- » भोर विधानसभा (ताथवडे) : 12 हजार मतदार

“ पिंपरी-चिंचवड शहरात चार सदस्यीय 32 प्रभाग रचना तयार करण्यासाठी प्राथमिक कामकाज सुरू करण्यात आले आहे. प्रभागरचना तयार करताना चिखली-तळवडेपासून सुरुवात करून सांगवी येथे समाप्ती केली जाईल. त्या क्रमाने प्रभागांना क्रमांक दिले जातील. आखून दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रभागरचना तयार केली जाईल. त्यादृष्टीने मनुष्यबळ नेमले जाणार आहे. या कामकाजाच्या समितीचे अध्यक्ष आयुक्त आहेत.

**- अविनाश शिंदे, सहाय्यक आयुक्त, निवडणूक विभाग, महापालिका**

---

# दाखल्यांच्या संकेतस्थळावर दिसणार स्वतंत्र पिंपरी-चिंचवड; स्वतंत्र तहसील कार्यालय अखेर कार्यान्वित

## अर्जदारांचा होणारा गोंधळ आणि तहसील कार्यालयाच्या बाहेरच्या हद्दीतील येणाऱ्या दाखल्यांची संख्या कमी होणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड अप्पर तहसीलदार कार्यालय स्वतंत्र झाल्यानंतर आता पूर्वीच्या पिंपरी-चिंचवडमधून (हवेली) लोणीकंद आणि हवेली गावाला वगळण्यात आले आहे. त्यामुळे आता शासनाचे वेगवेगळे संकेतस्थळ आणि दाखल्यांवर पिंपरी चिंचवड स्वतंत्र दिसू लागले आहे. परिणामी, अर्जदारांचा होणारा गोंधळ आणि तहसील कार्यालयाच्या बाहेरच्या हद्दीतील येणाऱ्या दाखल्यांची संख्या कमी होणार आहे. त्यामुळे कार्यालयावरचा अतिरिक्त ताण कमी होणार आहे.

नागरिकांना शालेय, वैद्यकीय अथवा वेगवेगळ्या योजनांसाठी दाखल्यांची आवश्यकता असते. जवळपास तेरा दाखले तहसील कार्यालयाकडून देण्यात येतात. ऑनलाइन अर्ज भरताना अनेकदा नागरिकांकडून हवेली म्हणून उल्लेख केला जातो. मात्र, संबंधित अर्ज हा पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालयाच्या बाहेरचा असतो.

त्यामुळे तो अर्ज तसाच पडून राहतो. त्यावरती संबंधित कार्यालय अथवा पिंपरी-चिंचवडकडूनदेखील कार्यवाही होत नाही. त्यामुळे नागरिकांना हेलपाटे मारावे लागतात. तसेच, प्राप्त झालेल्या अर्जांमधून नेमके पिंपरी चिंचवड संबंधित अर्ज कोणते आहेत, याची चाचपणी करावी लागते.

आता केवळ पिंपरी-चिंचवड शहर संलग्न आणि तहसील कार्यालयअंतर्गत येणाऱ्या 30 गावांचा समावेश होणार आहे. त्यामुळे अर्जांचा ताण कमी होणारा असून, इतर अर्ज त्यामध्ये समाविष्ट होणार नाहीत.




### दाखल्यांचा ताण होणार कमी

**» पिंपरी-चिंचवड तहसीलदारअंतर्गत जवळपास 30 गावे आहेत. त्यामध्ये शहराबरोबर माळीनगर, विठ्ठलनगर, देहुगाव, चिंचोली, किन्हई, बोपखेल मामुर्डी या गावांचादेखील समावेश होतो.. यापूर्वी हवेलीअंतर्गत या गावाच्या बाहेरूनदेखील अर्ज येत होते. त्यानंतर संबंधित अर्ज पुन्हा त्या त्या विभागाकडे पाठवावे लागत होते. मात्र आता तो ताण कमी होणार आहे.**

“ पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालयाला स्वतंत्र कारभार झाल्याने आता दाखल्यांचा ताण कमी होणार आहे. यापूर्वी या कार्यालयास संबंधित दाखले निवडावे लागत होते. मात्र, आता ते थेट दाखल होतील. त्यामुळे दाखले लवकरात लवकर मार्गी लागतील.

**- जयराज देशमुख, अप्पर तहसीलदार, पिंपरी चिंचवड**

“ दाखल्यांच्या संकेतस्थळावर स्वतंत्र पिंपरी-चिंचवड असे नमूद केल्याने आता नेमके दाखल्यांचे अर्ज सादर होतील, त्यामुळे ते तपासून पाठवणे सोपे होणार आहे.

**- मनीषा माने, नायब तहसीलदार पिंपरी-चिंचवड**

# हवेली तालुक्यातील जिल्हा परिषदेचे 7 गट, 14 गण कमी

## मिनी विधानसभेसाठी आता नवीन चेहऱ्यांना संधी मिळण्याची आशा

**पुणे | प्रतिनिधी**

हवेली तालुक्यातील 23 गावे म्हणजे तब्बल अडीच लाखांपेक्षा आधिक लोकसंख्या पुणे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झाल्याने हवेली तालुक्यातील जिल्हा परिषदेचे 7 गट कमी झाले असून नवीन गट रचनेत जुन्नर, खेड, भोर, दौंड आणि इंदापूर तालुक्यात प्रत्येकी एक गटाची वाढ झाली आहे. या तालुक्यात गट-गणांच्या रचनेत मोठे फेरबदल होणार असल्याचे स्पष्ट झाले. हवेली तालुक्यात आता 13 ऐवजी 6 गट व 26 ऐवजी 12 गण असतील यावर आता शिक्कामोर्तब झाल्याने नवीन चेहऱ्यांना संधी मिळण्याची अशा आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे आदेश नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे निवडणुका घेण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोग सक्रिय झाला आहे. जिल्हा परिषदेची गट रचना व पंचायत समित्यांची गण रचना करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले आहेत. ही रचना करण्याची कार्यवाही तातडीने सुरू करावी असे निवडणूक आयोगाने आदेश दिल्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची निवडणूक लवकरच होण्याची शक्यता आहे. मिनी विधानसभेच्या निवडणुकीची चाहूल लागताच हवेली तालुक्यातील प्रतीक्षेत असलेले इच्छुक आगामी निवडणुकीसाठी जोमाने तयारीला लागले आहेत. तीन वर्षांपासून निवडणुकीची आस लावून बसलेल्या इच्छुकांना जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीचे वेध लागले आहेत.



### इच्छुकांसह कार्यकर्ते संभ्रमात

» हवेली तालुक्यात अद्याप निवडणुकी संदर्भात पक्षीय पातळीवर कोणतीच चर्चा झाल्याचे दिसून येत नाही. विधानसभा निवडणूक निकालानंतर कुठल्याच पक्षाने एकही मेळावा किंवा तालुका पातळीवर कार्यकर्त्यांची जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकी संदर्भात बैठक झाल्याची दिसून येत नाही. हवेली तालुक्यात राज्यात सत्तेवर असणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट व भाजपकडून इच्छुकांची संख्या जास्त असल्याचे दिसून येत आहे. दोन्ही राष्ट्रवादी व शिवसेना (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष)- मनसे एकत्र आले तर घड्याळ हातात बांधावे, तुतारी वाजवावी, धनुष्याचा बाण ओढावा का रेल्वे इंजिनमध्ये बसावे अशा दुहेरी द्विधा मनस्थितीत इच्छुक उमेदवार व काही निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. ही मिनी मंत्रालयाची निवडणूक पुढील राजकीय निवडणुकीची खरी तालीम असणार आहे.

### गावकारभारी झाले रिचार्ज

» पूर्वी ग्रामपंचायतींना शासनाकडून कमी प्रमाणात निधी मिळत होता. ग्रामविकासाची कामे करण्यास अडचणी येत होत्या. आता प्रत्येक ग्रामपंचायतीला शासनाकडून वित्त आयोगाच्या किंवा विविध हेडच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध होत आहे. त्यामुळे अनेक ग्रामपंचायती मालामाल झाल्या आहेत. त्यामुळे कारभारी दणकट झाले आहेत. अनेक मतदारसंघात मतरुण व जुने जाणते असाही सामना रंगणार आहे. तरुण आपल्या नवनवीन कल्पकतेच्या जोरावर निवडणूक लढणार की जुने जाणते आपला शिलकीतला डाव टाकून समोरच्या तरुणाला धोबीपछाड करणार, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. निवडणूक काही महिन्यावर आली असली तरी आत्तापासूनच गावकारभारी रिचार्ज झाले आहेत.

### आघाडी, युती की बिघाडी?

» सध्याच्या राजकीय वातावरणावरून महायुती व महाविकास आघाडी ही निवडणूक एकत्रितपणे लढणार की वेगवेगळे या बाबतीत संभ्रमावस्था आहे. गट गण रचना व आरक्षण सोडत अद्याप बाकी असले तरी गट गणाचे व आरक्षणाचे अंदाज बांधत इच्छुक मात्र तयारीला लागले आहेत. आगामी जिल्हा परिषद व पंचायत पंचायत समिती निवडणुकीत महाविकास आघाडी बाजी मारणार का महायुती विजयाचा झेंडा फडकवणार हे निकाल लागल्यानंतरच समजणार आहे.

# भोर तालुक्यात १३०.६८ हेक्टरवरील पिके, फळबागांचे नुकसान

## एकवीस लाखापर्यंत नुकसान भरपाई मिळणार : तालुका कृषी अधिकारी शरद धर्माधिकारी यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

भोर तालुक्यात मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे उन्हाळी बागायती पिकांचे सुमारे १३०.६८ हेक्टर क्षेत्रावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना शासनाच्या आदेशानुसार २१ लाखापर्यंत नुकसान भरपाई मिळणार असल्याची माहिती भोर तालुका कृषी अधिकारी शरद धर्माधिकारी यांनी दिली.

भोर तालुक्यात ७ मे ते २९ मेपर्यंत अवकाळी पाऊस सरासरीच्या ९०० टक्के झाल्याने शेतकऱ्यांच्या उन्हाळी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काढणी योग्य भुईमूग, सोयाबीन, बाजरी, कांदा ही पिके पावसात भिजून,शेतात पाणी साचल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेतकऱ्याचे वर्षभराचे मिळणारे बाजरी, शेंगदाणा तेल, जनावरांना मिळणारी पेंड, भुईमुगाचे टाळे (काड) यांचा फटका शेतकऱ्यांना मोठा बसला आहे. यामुळे शेतकऱ्याचे वर्षभराचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

४६ गावातील ३५२ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. यात भात – ०.२० गुंठे, सोयबिन – २०.७३ हेक्टरी ,भूईमुग – ५७.८४ हेक्टरी, बाजरी – ९.०५ हेक्टरी, ज्वारी – १.९७ हेक्टरी, इतर – ३.२० हेक्टरी नुकसान झाले असून २३ गावातून १०९ शेतकऱ्याचे भाजीपाला – २४.०७ हेक्टरी, फूले – ०.१५ हेक्टरी एवढे नुकसान झाले असून फळामध्ये ११ गावातून ३८ बाधित शेतकऱ्याचे फळामधील आंबा – १३.४७ हेक्टरी नुकसान झाले असून एकूण ३३ टक्केवर फळपिके सोडून जिरायतबाधित क्षेत्र ९२.९९ हेक्टरी, बागायत बाधित क्षेत्र २४.२२ हेक्टरी, फळपिकाखालील बांधित क्षेत्र १३.४७ हेक्टरी, असे तालुकयात एकूण ४९९ शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना शासनाच्या आदेशानुसार २१ लाखापर्यंत नुकसान भरपाई मिळणार असल्याची माहिती भोर तालुका कृषी अधिकारी शरद धर्माधिकारी यांनी दिली.



### जलवाहिनी फुटण्याचे प्रमाण वाढले

» भोर तालुक्यातील ४६ गावातील ३५२ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. यात भात – ०.२० गुंठे, सोयबिन – २०.७३ हेक्टरी , भूईमुग – ५७. ८४ हेक्टरी , बाजरी – ९.०५ हेक्टरी , ज्वारी – १.९७ हेक्टरी, इतर – ३.२० हेक्टरी नुकसान झाले असून २३ गावातून १०९ शेतकऱ्याचे भाजीपाला – २४.०७ हेक्टरी , फूले – ०.१५ हेक्टरी एवढे नुकसान झाले.

“ मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे उन्हाळी बागायती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. महसूल विभागाचे ग्रामविकास अधिकारी, ग्राममहसूल अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन झालेल्या पिकांचा पंचनामा करुन शासनाकडे त्यांचा अहवाल पाठविला आहे. शासनाच्या नियमानुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार आहे.

- राजेंद्र नजन, तहसीलदार भोर